उपक्रम

# ‘मधुक्रांती-२०२३’ परिसंवादातून मधमाशी पालन व्यवसायाचा सांगोपांग वेध

- मधमाशी पालनातील व्यावसायिक संधींविषयी विचारमंथन
- महाराष्ट्रातील तसेच राष्ट्रीय पातळीवरील सद्य:स्थितीचा आढावा
- मधु-उद्योजक, शेतकरी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग
- चर्चेतून अभ्यासपूर्ण प्रबोधन; उपस्थितांचे सुयोग्य शंकासमाधान




पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथे दि. २० आणि २१ मे दरम्यान आयोजित ‘बसवंत मधुक्रांती-२०२३’ या परिसंवादात, प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना पुणेस्थित महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाचे संचालक डॉ.श्री. कैलास मोते. समवेत व्यासपीठावर श्री. महेश पाटील, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. संजय पवार, डॉ.श्री. बी.बी. पवार, श्री. विवेक सोनवणे, श्री. गोकुळ वाघ, श्री. कैलास शिरसाट, श्री. सुनील पाटील, श्री. मदन शर्मा, श्री. सुभाष कंबोज, श्री. संजीव तोमर आदी मान्यवर.

राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान अंतर्गत राज्यस्तरीय परिसंवाद - 2023
महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे आणि
ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि., नाशिक संचलित बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# राज्यस्तरीय परिसंवाद

## मधमाशी पालनाची महाराष्ट्रातील सद्य:स्थिती आणि नाविन्यपूर्ण संकल्पनेतून उद्योजकता विकास

**दि. 20 - 21 मे 2023**

### उद्घाटन सत्राची कार्यक्रम पत्रिका

**दि. २० मे २०२३ (सकाळी १० ते ११.३०)**

सकाळी १०.०० : पाहुण्यांचे कार्यक्रमस्थळी आगमन

१०.०० ते १०.०५ : दीपप्रज्वलन

१०.०५ ते १०.१५ : स्वागत व प्रास्ताविक :
**डॉ. श्री. भास्कर गायकवाड**

१०.१५ ते १०.२५ : मधमाशी पालनाच्या प्रसारामध्ये बसवंत गार्डनचे योगदान-
**श्री. संजय पवार**

१०.२५ ते १०.४० : **बसवंत मधुक्रांती- २०२२** चे पुरस्कार वितरण
**'पूर्वा कृषिदूत'** मासिकाच्या जागतिक मधमाशी दिनानिमित्तच्या विशेषांकाचे प्रकाशन

१०.४० ते १०.५५ : **मा. श्री. मोहन वाघ**
विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक

१०.५५ ते ११.०५ : अध्यक्षीय भाषण
**मा. डॉ. श्री. वी.वी. पवार**

१०.०५ ते ११.२५ : प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन
**मा.डॉ. कैलास मोते,** संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे

११.२५ ते ११.३० : आभार प्रदर्शन,
**श्री. सुनील पाटील,** जनरल मॅनेजर, पूर्वा केमटेक प्रा.लि.

**ठिकाण :- बसवंत मधमाशी उद्यान, मुखेड रोड, पिंपळगांव बसवंत, जि. नाशिक**

# कार्यक्रमाची रूपरेषा

**दि. २० मे २०२३**

| | | |
|---|---|---|
| स. ९.३० ते १०.०० | : | नाव नोंदणी |
| १० ते ११.३० | : | उद्घाटन सत्र आणि मधुक्रांती पुरस्कारांचे वितरण |
| ११.३० ते ११.४५ | : | चहापान |
| ११.४५ ते १.१५ | : | **तांत्रिक सत्र–१ अध्यक्ष : डॉ. कैलास मोते**<br>बी ब्रीडिंग, मधमाशीच्या वसाहती विभाजन : **श्री. संजीव तोमर,**<br>सेक्रेटरी, तनिष्क ग्रामीण सेवा संघ, उत्तर प्रदेश<br>मध उत्पादनाची भारतीय आणि जागतिक स्थिती : **श्री. मदन शर्मा,**<br>मधमाशी उद्योजक, चंदिगड |
| १.१५ ते २.१५ | : | भोजन |
| दु. २.१५ ते ४.०० | : | **तांत्रिक सत्र–२ अध्यक्ष : डॉ. बी.बी. पवार**<br>व्यापारी तत्त्वावर मधमाशी पालन : **श्री. सुभाष कंबोज**<br>संस्थापक, कंबोज हनीबी फार्म, यमुनानगर, हरियाणा<br>महाराष्ट्रामध्ये ॲपी टुरिझमला संधी : **श्री. संजय पवार**<br>कार्यकारी संचालक : ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि., नाशिक<br>महाराष्ट्रातील मधमाशी पालन– सद्य:स्थिती आणि संधी : **डॉ. भास्कर गायकवाड**<br>टेक्निकल डायरेक्टर, ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि. नाशिक |
| दु. ४.०० ते ४.१५ | : | चहापान |
| ४.१५ ते ५.०० | : | पुरस्कारार्थींचे मनोगत |

**दि. २१ मे २०२३**

| | | |
|---|---|---|
| स. १० ते ११.३० | : | बसवंत मधमाशी उद्यान तसेच बसवंत गार्डनला भेट आणि प्रात्यक्षिक |
| ११.३० ते ११.४५ | : | चहापान |
| ११.४५ ते १.३० | : | **तांत्रिक सत्र–३ अध्यक्ष : डॉ. योगेश्वर सिंग**<br>परागीभवनासाठी मधमाशी सेवा पुरवठा : **डॉ. हरिश शर्मा,**<br>प्रमुख शास्त्रज्ञ, डॉ. वाय.एस. परमार कृषी विद्यापीठ, सोलन (हिमाचल प्रदेश)<br>मधमाशी क्लस्टर निर्मिती : **डॉ. देवव्रत शर्मा,**<br>संस्थापक, हायटेक नॅचरल प्रॉडक्ट, मधमाशी तज्ञ– नवी दिल्ली |
| दु. १.३० ते २.३० | : | भोजन |
| दु. २.३० ते ४.०० | : | **तांत्रिक सत्र–४ अध्यक्ष : डॉ. हरीश शर्मा**<br>जागतिक, देशपातळीवरील मधमाशी पालन : **डॉ. तुकाराम निकम,**<br>संचालक, सुप्रकृती मधुशाळा, नाशिक<br>मधमाशीपासून विविध पदार्थांची निर्मिती : **डॉ. धनंजय वाखले,**<br>तांत्रिक अधिकारी (निवृत्त), सीबीआरटीआय, पुणे<br>फुलोरी मधमाशी संवर्धनाचे तंत्रज्ञान : **प्रा. उत्तम सहाणे**<br>विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड, पालघर<br>बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राचे योगदान : **नितीन कराळे** |
| ४.०० ते ४.१५ | : | चहापान |
| दु. ४.१५ ते ५.०० | : | मुक्तचर्चा आणि समारोप |

**ठिकाण :– बसवंत मधमाशी उद्यान, मुखेड रोड, पिंपळगांव बसवंत, जि. नाशिक**

# 'बसवंत मधुक्रांती-२०२३' परिसंवादातील समृद्ध विचारमंथनाचा आढावा...

**म**हाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे आणि ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि., नाशिक संचलित बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला मधुक्रांती-२०२३' हा राज्यस्तरीय परिसंवाद दि. २० ते २१ मे दरम्यान बसवंत गार्डन, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे नुकताच पार पडला. **'मधमाशी पालनाची महाराष्ट्रातील सद्य:स्थिती आणि नाविन्यपूर्ण संकल्पनेतून उद्योजकता विकास'** हे सूत्र परिसंवादाच्या केंद्रस्थानी होते.

शनिवार, दि. २० मे रोजी सकाळी १० ते ११.३० या दरम्यान परिसंवादाचा उद्घाटन सोहळा झाला. या कार्यक्रमाला पुणेस्थित महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी मंडळाचे संचालक डॉ.श्री. कैलास मोते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. विवेक सोनवणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. राहुरीच्या म. फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

यावेळी ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि. चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार, ग्रीनझोनचे टेक्निकल डायरेक्टर तसेच पूर्वा कृषिदूत मासिकाचे संपादक डॉ.श्री. भास्कर गायकवाड, कृषी उपसंचालक श्री. कैलास शिरसाट, नाशिक उपविभागीय कृषी अधिकारी श्री. गोकुळ वाघ तसेच श्री. बर्वे यांसह कृषी विभागाचे इतर उच्चपदस्थ अधिकारी, ग्रीनझोन कंपनीचे संचालक श्री. विजय पवार, श्री. महेश पाटील, श्री सुनील पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या परिसंवादाला राज्यभरातून २५० पेक्षा अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

दीपप्रज्वलनानंतर **डॉ. भास्कर गायकवाड** यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये डॉ. गायकवाड म्हणाले की, मागील चार वर्षांपासून बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून 'बसवंत मधुक्रांती' या राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. महाराष्ट्रातील मधमाशी पालन उद्योग फारच मागे आहे, त्याची कारणेही डॉ. गायकवाड यांनी सांगितली. ते पुढे म्हणाले की, या विषयाच्या संदर्भात वेळोवेळी चर्चा करून ते प्रश्न सोडविण्यात आले तर महाराष्ट्रामध्ये मधमाशी पालन व्यवसाय पुढे घेऊन जाता येईल. यासाठी सर्व विभागांनी एकत्रित काम करण्याची आवश्यकता आहे. याचाच विचार करून या वर्षीच्या परिसंवादाचा विषय निवडण्यात आला आहे. नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करून महाराष्ट्रामध्ये मधमाशी पालन कशाप्रकारे पुढे घेऊन जाता येईल आणि उद्योजकता वाढविता येईल यादृष्टीने उत्तर भारतातील अनेक राज्यांतील तज्ज्ञांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राने राज्यातील मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल बोलताना **श्री. संजय पवार** म्हणाले की, मधमाशी पालनाचे प्रशिक्षण देताना प्रचार- प्रसार करण्यासाठी मनोरंजनातून शिक्षण देण्याची संकल्पना बसवंत गार्डनने मांडली. या गार्डनमध्ये आनंदी, उत्साही वातावरणामध्ये मधमाशी पालनाची माहिती दिली जाते. मधमाशीबद्दल सविस्तर माहिती देण्याची सर्व व्यवस्था येथे करण्यात आली असून, 'के.जी. टू पी.जी.'- म्हणजेच लहान मुलांपासून ते वयस्क माणसांपर्यंत हे ज्ञान देण्याचे कार्य सुरू आहे. यातून मधमाशीचा प्रचार- प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. मधमाशीला केंद्रस्थानी ठेवून- ॲपिटुरिझमची संकल्पना मांडून देशातील पहिले ॲपिटुरिझम सेंटर कार्यान्वित झाले आहे. या माध्यमातून हजारो व्यक्ती लाभ घेत आहेत.

यानंतर बसवंत मधुक्रांती पुरस्कार वितरित करण्यात आले. त्यात खालील पुरस्कारार्थींचा सन्मान करण्यात आला.

**संस्था श्रेणीत** शिवस्फूर्ती प्रोसेसिंग फाऊंडेशन, संचालकः श्री. सुनील चंद्रकांत भालेराव, मु.पो. शहापूर, ता. चिखलदरा, जि. अमरावती. **व्यक्ती श्रेणीत** श्री. दयावान श्रीकांत पाटील, मु.पो. कणेरी मठ, ता. करवीर, जि. कोल्हापूर. **मध उद्योजक या श्रेणीत** श्री. ऋषिकेश हरिभाऊ औताडे, मु. इंदिरानगर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर (विभाग : उत्तर महाराष्ट्र), योगिता प्रभाकर इंगळे, मु.पो. मार्केडा, ता. दर्यापूर, जि. अमरावती (विभाग

: विदर्भ), श्री. तेजस सहदेव लिमकर, मु.पो. रुई, परांडा, धाराशिव (उस्मानाबाद) (विभाग : मराठवाडा), ज्योत्स्ना जयवंतराव देसाई, मु.पो. अर्जुनवाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर (विभाग : प. महाराष्ट्र) आणि श्री. राजू इर्शद मंडळ, मु.पो. कोसबाड (चिंबावे), ता. डहाणू, जि. पालघर. तसेच **मधमाशी पालनात विशेष योगदान** दिल्याबद्दल ज्येष्ठ कीटकशास्त्रज्ञ व सुप्रकृती मधमाशी प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ.श्री. तुकाराम निकम आणि कोसबाड येथील कृषी विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ प्रा. उत्तम सहाणे यांना मधुक्रांती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून **डॉ. बी.बी. पवार** यांनी मधमाशी आणि परागीभवन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. पिकाच्या उत्पादन वाढीसाठी परागीभवन महत्त्वाचे आहे आणि यासाठीच मधमाश्या वाचविल्या पाहिजेत. खरं तर यासाठी शेतकऱ्यांबरोबरच शाळा- कॉलेजच्या पातळीवरही जास्तीत जास्त प्रयत्न करण्याची गरज आहे. कृषी विद्यापीठे तसेच कृषी क्षेत्राशी संलग्न सर्व संस्थांनी मधमाशी उद्योगाला बळ देण्यासाठी पुढे येणे आवश्यक असल्याचे मतही डॉ. बी.बी. पवार यांनी व्यक्त केले.



परिसंवादाचे उद्घाटक **डॉ. कैलास मोते** यांनी बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. अशा प्रकारचे कार्य महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी सुरू करण्याचे आवाहनही त्यांनी केले. भारत सरकारच्या माध्यमातून मधमाशी व्यवसायाला बळकटी आणि मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिलेला आहे. महाराष्ट्रातून मधमाशी उद्योगाला पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांनी त्यांचे प्रस्ताव दिले तर त्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी हे मंडळ सदैव तत्पर राहील. यासाठी मोठ्या प्रमाणात प्रबोधन करण्याचे कार्य या मंडळाच्या माध्यमातून होत असून, विभागनिहाय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये आणखी कोणकोणत्या योजना राबविता येतील याबद्दल काही सूचना केल्यास नक्कीच त्याचा विचार करण्यात येईल. मधमाशी वसाहत निर्मिती, मधाचे संकलन, मधप्रक्रिया, प्रत तपासणी, निर्यात यासाठी तीन मिशन्स असून ज्यांना ज्या योजनेचा फायदा घ्यायचा आहे त्यांनी त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करून सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले. ज्या शेतकरी-मधमाशीपाळांना हा व्यवसाय करायचा आहे, त्यांना शासनाची सर्वतोपरी मदत मिळेल, अशी ग्वाहीही डॉ. मोते यांनी यावेळी दिली.



कार्यक्रमाच्या दरम्यान **'पूर्वा कृषिदूत'** मासिकाच्या जागतिक मधमाशी दिनानिमित्त प्रकाशित केलेल्या मधमाशी



**'पूर्वा कृषिदूत' मासिकाच्या मधमाशी पालन व्यवसाय विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन.**

पालन विषयावरील विशेषांकाचे विमोचन करण्यात आले.



'पूर्वा केमटेक' प्रा.लि.चे महाव्यवस्थापक **श्री. सुनील पाटील** यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

परिसंवादाच्या पहिल्या दिवशीच्या (दि. २० मे) पहिल्या तांत्रिक सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. कैलास मोते यांनी भूषविले.

या सत्रात बोलताना उत्तर प्रदेशातील तनिष्क ग्रामीण सेवा संघाचे सेक्रेटरी **श्री. संजीव तोमर** यांनी बी-ब्रीडिंग आणि मधमाशीच्या वसाहतींचे विभाजन या विषयावर मार्गदर्शन केले. देशामध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात मधमाशीच्या वसाहती कमी होत असून त्यांची संख्या वाढविण्यासाठी बी-ब्रीडिंग करण्याची गरज आहे. चांगल्या प्रतीच्या मधमाशीच्या वसाहती कशा ओळखायच्या, त्यातील शेतीमालाची कार्यक्षमता कशी ओळखायची आणि त्यानुसार तिची निवड करून त्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त राणीमाश्या तयार करून नवीन वसाहतींची निर्मिती कशी करायची याबद्दल सविस्तर माहिती त्यांनी दिली. परदेशात चांगल्या राणीमाश्या तयार करून त्या हजारो रुपयांना विकल्या जातात. आपल्याकडे मात्र हे काम फारच कमी प्रमाणावर सुरू आहे. व्यापारी तत्त्वावर मधमाशी पालन करायचे असेल तर चांगल्या प्रतीच्या मधमाशीच्या वसाहती तयार करणे गरजेचे आहे. काही वसाहती ७०-७५ किलो मधाचे उत्पादन देतात तर काही वसाहती फक्त १५-२० किलो मधाचे उत्पादन देतात. या सर्व बाबींचा विचार करून बी ब्रीडिंग केले, तसेच वसाहतीचे विभाजन करून सक्षम वसाहतीचा पुरवठा मधपाळांना केला तर नक्कीच याचा फायदा मधुक्रांतीसाठी होईल, असे त्यांनी सांगितले.




याच सत्रात बोलताना चंदिगडचे मधमाशी उद्योजक **श्री. मदन शर्मा** यांनी जागतिक तसेच देशपातळीवरील मध उत्पादन आणि मधमाशी पालनाची माहिती दिली. जगात भारत पाचव्या स्थानावर असला तरी चीनसारखा देश- जो सध्या पहिल्या स्थानावर आहे, त्याच्या पुढे जाण्याची क्षमता भारतामध्ये आहे. अर्थात यासाठी नियोजन करण्याची जास्त गरज आहे. अनेक देशांमध्ये मधमाशी व्यवसायाला तसेच मधमाशीच्या संवर्धनाला कायद्याचे संरक्षण आहे. भारतातील मधमाशी पालन म्हणजे जे काही प्रयत्न मधपाळांनी केले आहेत, त्याचाच केवळ परिपाक आहे. शासनाचे मोठे पाठबळ मधमाशी पालनाला मिळाले तर पुढील दशकामध्ये भारत जगातील आघाडीचा मध उत्पादक होईल. देशात ३६ लाख मधमाश्यांच्या वसाहती आहेत. त्यांची संख्या आपण २०० ते ३०० लाखांपर्यंत नेऊ शकतो. यासाठी मध उत्पादनापासून ते निर्यात करण्यासाठी सर्व व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अनेक देशांतील मध उत्पादन, त्याची प्रत, विक्री याबद्दलचे सविस्तर मार्गदर्शनही श्री. शर्मा यांनी केले.

सत्राचे प्रमुख डॉ. कैलास मोते यांनी या दोन्ही वक्त्यांचे आभार मानले आणि अशा तज्ज्ञांचा सल्ला घेऊन महाराष्ट्रातील मधमाशी पालन व्यवसायाला समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत व्यक्त केले.

दुसऱ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्षस्थान डॉ.श्री. बी.बी. पवार यांनी भूषविले.

या सत्रात बोलताना हरियानातील यमुनानगर येथील कंबोज हनीबी फार्मचे संस्थापक **श्री. सुभाष कंबोज** यांनी व्यापारी तत्त्वावर मधमाशी पालन या विषयावर स्वानुभवातून कशा प्रकारे पुढे जाता येईल याबद्दल सविस्तर माहिती दिली. मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमामध्ये आतापर्यंत दोन वेळा कंबोज यांनी प्रधानमंत्र्यांसमवेत हितगुज केले आहे. प्रधानमंत्र्यांनी त्यांना 'हनीमॅन' म्हणून संबोधले होते. कंबोज हे मधमाशी पालन व्यवसायात २० वर्षांपासून आहेत. दोन कॉलनींपासून



सुरुवात करून त्यांनी २००० पर्यंत मधमाश्यांच्या वसाहती वाढविल्या आहेत. शिक्षकाची नोकरी सोडून त्यांनी हा व्यवसाय स्वीकारला. देशातील अनेक प्रांतांमध्ये जाऊन ते मध संकलनाचे काम करतात. त्यांनी स्वत:चा ब्रॅण्ड तयार केला असून, त्यांची वार्षिक उलाढाल पाच कोटी रुपये आहे. व्यापारी तत्त्वावर मधमाशी पालन करण्यासाठी मधमाश्यांचे ज्ञान महत्त्वाचे आहे, ज्यासाठी आपण मधमाश्यांच्या सहवासामध्ये जास्तीत जास्त काळ राहण्याची गरज आहे. आत्मविश्वास, कष्ट घेण्याची तयारी, नफा-तोटा सहन करण्याची तयारी तसेच ज्या भागात मधमाश्यांना फुलोरा उपलब्ध असतो त्याची माहिती असेल तर या व्यवसायामध्ये चांगले यश मिळते. या व्यवसायात फार मोठी संधी असून, जास्तीत जास्त युवकांनी या व्यवसायामध्ये यावे, असे मत त्यांनी व्यक्त केले. व्यापारी पद्धतीने मधमाशी पालनाचे बारकावे त्यांनी आपल्या भाषणात सहज-सोप्या भाषेत समजावून सांगितले.

आपले मनोगत व्यक्त करताना ग्रीनझोन ॲग्रोकेमचे



कार्यकारी संचालक **श्री. संजय पवार** म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये टुरिझम वाढत आहे. त्याला ॲपिटुरिझमची साथ दिली तर मधमाशी पालनाबरोबरच टुरिझममधूनही चांगले आर्थिक उत्पन्न मिळवता येईल. यासंदर्भात त्यांनी युरोपातील स्लोव्हेनिया या लहानशा देशाचे उदाहरण दिले. तेथे मधमाशी पालन मोठ्या प्रमाणात केले जाते. यासाठी तिकडे जोड दिली ती टुरिझमची. आज जगामध्ये स्लोव्हेनिया देशाचे नाव ॲपिटुरिझमसाठी अग्रक्रमाने घेतले जाते. बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रही ॲपिटुरिझम सेंटर म्हणून तयार झाले असून, मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे भेट देऊन मधमाशीची माहिती घेत आहेत. युवक, महिला, शेतकरी यांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांमध्येही मधमाशी पालनाचे बीज आताच रोवले तर पुढील काळात यामध्ये मोठी प्रगती करता येईल. जगामध्ये ॲपिमोंडियासारख्या मधमाशी पालन व्यवसायाच्या विशेष प्रदर्शनामध्ये मधमाशीबद्दलची सर्वंकष माहिती दिली जाते. भविष्यात भारतामध्ये विशेषत: महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचा उपक्रम राबवता येईल. यासाठी सर्व विभागांनी प्रयत्न केले तर हे शक्य होईल. मधमाशी पालन व्यवसायाला बसवंत गार्डनच्या माध्यमातून नक्कीच पाठबळ दिले जाईल, असे आश्वासनही श्री. पवार यांनी दिले.

ग्रीनझोन ॲग्रोकेमचे टेक्निकल डायरेक्टर तसेच 'पूर्वा



कृषिदूत' मासिकाचे संपादक **डॉ. भास्कर गायकवाड** यांनी 'महाराष्ट्रातील मधमाशी पालन व्यवसायाची सद्य:स्थिती आणि भविष्यातील संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र शेती क्षेत्रामध्ये आघाडीवर असूनही मधमाशी पालनामध्ये मात्र पिछाडीवर आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. मधमाश्यांच्या कमी वसाहती, मधपाळांची कमी संख्या, विविध विभागांमध्ये असलेले त्यामधील योगदान तसेच राज्यातील शेती- पिकांची उपलब्धता या विषयावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र मधमाशी पालनामध्ये मागे असून, त्यामध्ये काम करायला मोठी संधी आहे. यातून हजारो युवक- युवती, शेतकरी यांना काम करण्याची तसेच रोजगार मिळविण्याची कशा प्रकारची संधी आहे याची सविस्तर आकडेवारी देखील डॉ. गायकवाड यांनी सादर केली. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी विभाग तसेच इतर संलग्न विभागांनी एकत्रित येऊन यात कोणत्या उणिवा आहेत, कशा प्रकारे संधी आहेत याची सविस्तर माहिती तयार करून, पुढील पाच वर्षांचा कालबद्ध कृती कार्यक्रम तयार करून राबविला तर देशात महाराष्ट्र मधमाशी पालनात आघाडीवर जाईल, अशी अपेक्षाही डॉ. गायकवाड यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी.बी. पवार यांनी तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाचे कौतुक करून शेती उत्पादन आणि मधमाशी पालन यांचा योग्य मेळ घालण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी 'मधुक्रांती पुरस्कारा'ने सन्मानित मधपाळांनी मनोगत व्यक्त केले. त्यांचे अनुभव कथनही झाले. यांमध्ये कोल्हापूरचे श्री. दयावान पाटील, अमरावतीच्या योगिता इंगळे तसेच धाराशिवचे (उस्मानाबाद) तेजस लिमकर यांनी त्यांचे अनुभव सांगितले. यानंतर परिसंवादाच्या पहिल्या दिवसाच्या परिसंवादाचा समारोप झाला.

परिसंवादाच्या दुसऱ्या दिवशी (दि. २१) सकाळी १० ते ११.३० या दरम्यान उपस्थित सर्व सहभागी व्यक्तींनी बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन विविध उपक्रमांची तसेच येथे चालणाऱ्या प्रात्यक्षिकांची माहिती घेतली.

सकाळी ११.४५ ते १.३० दरम्यान झालेल्या तिसऱ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्षस्थान 'आत्मा' नाशिकचे प्रकल्प संचालक **श्री. राजेंद्र निकम** यांनी भूषविले.

या सत्रात बोलताना हिमाचल प्रदेशातील सोलन येथील वाय.एस. परमार कृषी विद्यापीठाचे प्रमुख शास्त्रज्ञ **डॉ. हरिश शर्मा** यांनी परागीभवनासाठी मधमाशी सेवा पुरवठा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी आजपर्यंत केलेले संशोधन तसेच अनेक प्रांतांतील अभ्यासावर आधारित आकडेवारी सादर केली. परागीभवनातून शेतीचे उत्पादन कशा प्रकारे वाढते आणि यासाठी मधमाशीच्या वसाहतींचा पुरवठा करण्याची सेवा देशात कशा प्रकारे देता येते याची माहिती दिली. हिमाचल प्रदेशमधील सफरचंदाचे उदाहरण घेऊन सफरचंदाचे उत्पादन देश आणि जागतिक पातळीवर कशा प्रकारे घटले आणि त्यासाठी मधमाशीच्या माध्यमातून परागीभवनाची सेवा देऊन उत्पादनात तसेच प्रतीमध्ये कशा प्रकारे वाढ करता आली याची आकडेवारी सादर केली. मधमाश्यांनी परागीभवन केले नाही तर मनुष्याला ते करावे लागेल. काही देशांमध्ये याप्रकारे कोट्यवधी रुपये खर्च करून माणसांद्वारे परागीभवन केले जाते. हे चित्र बदलायचे असेल तर मधमाशीचे संवर्धन करावे लागेल. आज हिमाचल प्रदेशामध्ये मधमाश्यांच्या वसाहती भाड्याने घेऊन त्याद्वारे सफरचंदाची शेती कशी केली जाते याची त्यांनी सविस्तर माहितीही दिली.




नवी दिल्ली येथील 'हायटेक नॅचरल प्रॉडक्टस्'चे संस्थापक तसेच मधमाशी पालन तज्ञ **डॉ. देवव्रत शर्मा** यांनी मधमाशीचा शास्त्रीय तपशील देऊन मध आणि डंख मारणे यापुढे जाऊन मधमाशीला जाणून घेण्याचे आवाहन केले. मधमाशीपासून मध, मेण, पराग, प्रोपोलिस, रॉयल जेली आणि बी व्हेनम या पदार्थांचे उत्पादन कशा प्रकारे घेता येते, त्यापासून कोणकोणते पदार्थ बनविता येतात, त्याला काय किंमत मिळते, मानवी आरोग्यामध्ये त्यांचे काय महत्त्व आहे याची सविस्तर माहिती दिली. मध उत्पादन घेणाऱ्या मधपाळांपेक्षा दहापट जास्त उत्पादन उपपदार्थ तयार करणार्या मधमाशी उद्योजकाला कशा प्रकारे मिळते हे त्यांनी आकडेवारीसह सिद्ध केले. याचबरोबर मधमाशी व्यवसायासाठी एकत्रित येऊन क्लस्टर तयार करावे, तसेच स्वत: उद्योजक होऊन काही जणांनी एकत्र येऊन कंपन्या तयार कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. यातूनच शाश्वत आणि किफायतशीर मधमाशी उद्योग उभा राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.



या सत्राचे अध्यक्ष श्री. **राजेंद्र निकम** यांनी आपल्या भाषणात दोन्ही वक्त्यांचे अभिनंदन करून अशा प्रकारचे प्रकल्प महाराष्ट्रात उभे राहणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

दुपारी २.३० ते ४.०० दरम्यान पार पडलेल्या चौथ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्षस्थान नवी दिल्ली येथील नॅशनल बी बोर्डचे निवृत्त कार्यकारी संचालक **डॉ. योगेश्वर सिंह** यांनी भूषविले.

यावेळी सुप्रकृती मधुशाळा, नाशिकचे संचालक **डॉ. तुकाराम निकम** यांनी जागतिक तसेच देशपातळीवरील मधमाशी पालन या विषयावर आपले मत मांडताना सांगितले की युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इस्त्राईल या देशांनी मधमाशी पालनामध्ये फार प्रगती केली आहे. ते देश मधमाशीच्या वसाहतींची गुणप्रत सुधारण्यासाठी नवीन प्रकारचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरत आहेत. मधमाशीच्या वसाहती सक्षम करून मधमाशी व्यवसाय शाश्वत करत आहेत. त्यांच्याकडे परागीभवनासाठी, विविध उत्पादने



घेण्यासाठी तसेच बी ब्रीडिंग- वसाहती तयार करण्यासाठी अशा तीन प्रकारामध्ये मधमाशी पालन चालते. शासनाबरोबरच समाजाचा मोठा सहभाग- सहकार्य मधमाशीच्या संवर्धनासाठी असते. इस्त्राईलसारख्या लहान देशाने त्यांच्या उत्पादनाची प्रत चांगली ठेवण्यासाठी तसेच जागतिक पातळीवर त्यांचा शेतीमालाला चांगली मागणी मिळविण्यासाठी मधमाशी पालनाचा आधार घेतला आहे. भारतामध्ये मधमाशी पालनाला फार मोठी संधी असून, पारंपरिक पद्धतीने मधमाशी पालनापेक्षा आधुनिक- व्यापारी पद्धतीने मधमाशी पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

सीबीआरटीआय, पुणेचे माजी तांत्रिक अधिकारी **डॉ. धनंजय वाखले** यांनी मधाची गुणवत्ता टिकविण्यासाठी तसेच मधाचा चांगला वापर वाढविण्यासाठीच्या वेगवेगळ्या संकल्पना आणि पद्धतींबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. जागतिक तसेच देशांतर्गत मध आणि इतर पदार्थांची मागणी वाढत असताना त्याचा दर्जा टिकविणे महत्त्वाचे आहे. कारण या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी मधाची गुणप्रत महत्त्वाची आहे, यासाठी मध काढण्यापासून ते विक्री व्यवस्था- ब्रँडिंग कशाप्रकारे करायचे याविषयी त्यांनी अनेक उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.



यानंतर कोसबाड (पालघर) येथील कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ **प्रा. उत्तम सहाणे** यांनी फुलोरी मधमाशीचे महत्त्व आणि तिचे स्थलांतर करण्यासाठीची पद्धती याविषयी स्वानुभव कथन तसेच केलेल्या कार्याबद्दलचे सादरीकरण केले. फुलोरी मधमाशी प्रत्येक शेतामध्ये संवर्धित केली तरीही शेती उत्पादनाला फार मोठा आधार मिळू शकतो. यासाठी गरजेनुसार स्थलांतर करून तिचा कशाप्रकारे फायदा घेता येईल याची माहिती त्यांनी सांगितली.





बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राचे प्रकल्प व्यवस्थापक **श्री. नितीन कराळे** यांनी बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून मधमाशीचा प्रचार- प्रसार करण्यासाठीचे विविध प्रयत्न आणि उपक्रमांची माहिती दिली.

या सत्राचे अध्यक्ष **डॉ. योगेश्वर सिंह** यांनी देशामध्ये मधमाशी पालनाची स्थिती, वेगवेगळ्या माध्यमांतून सुरू असलेले शासकीय प्रयत्न, मधपाळांचे यामधील योगदान तसेच भविष्यात कशा प्रकारे मधमाशी व्यवसाय पुढे घेऊन जाता येईल, याबद्दलची सविस्तर माहिती दिली. तसेच या सत्रात तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभार मानले.



या चारही सत्रांनंतर समारोपाचा कार्यक्रम झाला. यामध्ये विषयतज्ज्ञांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची यथोचित उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि वनस्पती मंडळ, पुणे तसेच ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम प्रा.लि. संचलित बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र, पिंपळगाव बसवंत यांनी आयोजित केलेल्या या परिसंवादाबद्दल उपस्थितांमधील अनेकांनी समाधान व्यक्त केले आणि अशा प्रकारे उपक्रम वरचेवर घ्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली; जेणेकरून महाराष्ट्रामध्ये मधमाशी पालन उद्योग पुढे घेऊन जाता येईल. मधमाशी पालन व्यवसायाची सद्य:स्थिती आणि भविष्यातील संधींविषयी विषयतज्ज्ञांनी केलेले मार्गदर्शन अतिशय उपयुक्त असल्याची प्रतिक्रिया या कार्यक्रमात सहभागी झालेल्या मधपाळ तसेच शेतकऱ्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **सायली लभडे** यांनी केले.

कृषी विभागाचे उपस्थित सर्व अधिकारी, तज्ज्ञ व्यक्ती, ग्रीनझोनचे सर्व पदाधिकारी आणि ज्यांनी हा परिसंवाद यशस्वी करण्यासाठी योगदान दिले, त्या सर्वांचे आभार मानून या परिसंवादाचा समारोप झाला.

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

## मिलांज आंबा महाराजा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

बसवंत गार्डन, मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे दि. १५ ते २१ मे २०२३ दरम्यान बसवंत कृषी पर्यटन महोत्सव संपन्न झाला. यावेळी आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी 'मिलांज आंबा महाराजा' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात महाराष्ट्रासह गुजरात आणि कर्नाटक या राज्यांतील शेतकऱ्यांनी आपल्या आंब्यांचे नमुने प्रदर्शनार्थ ठेवले होते. या स्पर्धेतील विजेत्यांचा मधुक्रांती-२०२३ परिसंवादाच्या दरम्यान पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

यामध्ये मिलांज- केशर व हापूस अशा दोन गटांमध्ये मिलांज महाराजाव्यतिरिक्त अन्य प्रत्येकी तीन विजेत्यांची निवड करण्यात आली. तसेच इतर आंबा जातींसाठी पाच शेतकऱ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार, ग्रीनझोन ॲग्रोकेमचे टेक्निकल डायरेक्टर डॉ.श्री. भास्कर गायकवाड तसेच पूर्वा केमटेकचे तांत्रिक अधिकारी श्री. दिलीप जगताप यांनी केले.

विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे-

**मिलांज महाराजा (हापूस)** : कुणाल शिंदे (शिरगाव, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी).

प्रथम : सुनील वारीसे (धोपटवाडी, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी), द्वितीय : मंगेश साळवे (घोलप, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी), तृतीय : दीपकभाई जे. पटेल (कालवाडा, ता. वलसाड, जि. वलसाड (गुजरात).

**मिलांज महाराजा (केशर)** : ब्रिजेशभाई पटेल (कालवाडा, ता. वलसाड, जि. वलसाड).

प्रथम : प्रभात सिंह चव्हाण (कोचवाडा, ता. वलसाड, जि. वलसाड (गुजरात), द्वितीय : सोनल रितेशभाई पटेल (बिनवाडा, ता. वलसाड, जि. वलसाड (गुजरात), तृतीय : वसंत गुरव (शिरवळी, ता. खेड, जि. रत्नागिरी).

उत्तेजनार्थ : १. श्री. सुरेश (मादुवडी, ता. कोलार, जि. कोलार (कर्नाटक), आंबा जात - बेनिशा), २. हिमांशू आर. नागले (अब्रामा, ता. वलसाड, आंबा जात - वनराज), ३. हितेशभाई एम. पटेल (खाजुर्डी, ता. वलसाड आंबा जात - दसेरी), ४. विकास वसंत वाळेकर (वळवणी, ता. खेड, जि. रत्नागिरी, आंबा जात - राजापुरी), ५. वसंत कचरू आहेर (मुखेड, ता. येवला, जि. नाशिक. आंबा जात - वनराज-४). ■

**कविता**



## खंत मनाची; सांगतो व्यथा बळीराजाची!

दोन घोडे होते टांग्याला, चौदा मजूर गडी शेतीकामाला
सात नंबरचा सातबारा होता, महसूल खातेउताऱ्याला...
विविध प्रकारची फळझाडे होती बांधाच्या कडेला
गायी-वासरांचा गोठा होता शेतकऱ्याच्या वाड्याला...
नातवांची संगत असायची नेहमी जेवणाच्या पंगतीला
दहीदूध, तूप लोणी हे पदार्थ असत सर्वांच्या ताटाला...
आजार तर कुठलाच नसायचा कुणाच्याही शरीराला!

खंत मनाची; सांगतो व्यथा शेतकरी बळीराजाची!
दरम्यानच्या काळात काय झालं हरितक्रांती झाली...
हरितक्रांतीनंतरचा काळ जरा सुखाचा गेला
पण शेणखताची जागा रासायनिक खतांनी घेतली...
तेव्हाच टागां झाला पलटी अन् घोडी फरार झाली!
शेतकऱ्याच्या गव्हाणीचे मग बैल दावणीला गेले
गायी- वासरांचा गोठा, मजुरांचा तुटवडा आला...
सात नंबरचा सातबारा साडेतीन एकरांवर आला
शेतकरी याच ठिकाणी तळहातावर आला...
तो आता नेहमी जातो रासायनिक खतांच्या दुकानाला
आणि म्हणतो, 'उधार खत देता का माझ्या पिकाला'?

खंत मनाची; सांगतो व्यथा शेतकरी बळीराजाची!
शब्द आठवतात म्हणून सांगावेसे वाटते पुन्हा...
जीवन आताशीक लागले कळू लागले सर्वांना
अन् डोळ्यांमधले पाणी हसत हसत लागले जळू...
सारी सारी होती वाटत होती आमची आम्हाला माणसे
त्यांना मात्र मुळीच आमच्याबद्दल वाटत नव्हते तसे...
आम्ही सरळ, प्रांजळ, सज्जन- नाही केला कधी दावा
पण न्यायाचा आमच्या मनात मात्र आहे हेवा!
मतलब ठेवून गोड हसणे हा स्वार्थी दुनियेचा कावा...

**- सुभाष सहादू सूर्यवंशी**
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ■